# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 21 August 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २१ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

* परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते उद्घाटन
* महिलांना सुरक्षा देण्यासाठी राज्यसरकार सक्षम–मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन–बदलापूर प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदेच्या पोलीस कोठडीत २६ ऑगस्टपर्यंत वाढ
* राज्यातल्या सगळ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि मुंबई उपनगरमधल्या सर्व महाविद्यालयामध्ये महिलांना स्व–संरक्षणाचं प्रशिक्षण दिलं जाणार
* उजनी पर्यटन आराखड्याच्या २८० कोटी रुपयांच्या कामांना राज्यशासनाच्या उच्च अधिकार समितीची मान्यता

आणि

* स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रॉस कंट्री स्पर्धेत आखाडा बाळापूरच्या नारायणराव वाघमारे महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपद

****

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषी महोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन झालं, यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे, आमदार पंकजा मुंडे, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्यापूर्वी परळी नगरीतून मान्यवरांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

नमो कृषी सन्मान योजनेचा चौथा हप्ता या उद्घाटन सोहळ्यात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे. भावांतर योजनेअंतर्गत कापूस आणि सोयाबीनचं अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यासही या कार्यक्रमातून प्रारंभ झाला.

यापुढे कांदा निर्यात बंदी केली जाणार नाही, अशी थेट घोषणा करण्याची वेळ आली असल्याचं, अजित पवार यांनी नमूद केलं. सोयाबीन, कापूस, कांदा, ऊस या सर्वच पिकांच्याबाबतीत सरकार सकारात्मक असल्याचं पवार यांनी नमूद केलं.

फडणवीस यांनी यावेळी केलेल्या भाषणात नद्यांचं समुद्रात वाहून जाणारं ५० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्याच्या योजनेला लवकरच मान्यता दिली जाणार असल्याचं सांगितलं. कृष्णा मराठवाडा सिंचन योजनेत बीडच्या हक्काचं पाणी पोहोचवलं जात असल्याची माहितीही फडणवीस यांनी सांगितलं.

पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, यांचीही यावेळी भाषणं झाली.

या पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवात कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, कृषी विद्यापीठ दालन, परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री केंद्र, आधुनिक कृषी अवजारं प्रदर्शन, स्वयंसहाय्यता महिला बचत गट निर्मित वस्तू पदार्थांची विक्री तसंच प्रदर्शन भरवण्यात आलं आहे.

****

दरम्यान, चौहान यांचं आज दुपारी नांदेड इथल्या श्री गुरु गोविंदसिंघजी विमानतळावर आगमन झालं. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी त्यांचं स्वागत केलं.

या महोत्सवासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचं आज दुपारी लातूर विमानतळावर आगमन झाल्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी त्यांचं स्वागत केलं. यावेळी उपस्थित महिला आणि मुलींनी पवार यांना राखी बांधून शुभेच्छा दिल्या.

****

महिलांना सुरक्षा देण्यासाठी राज्यसरकार सक्षम असून अत्याचार करणाऱ्या आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. ते आज रत्नागिरीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मेळाव्यात बोलत होते. बदलापूरच्या घटनेचं राजकारण करणं गैर आहे,

मात्र विरोधकांना त्याचा विसर पडला, असं मुख्यमंत्री म्हणाले. काल बदलापूर रेल्वे स्थानकावर झालेलं आंदोलन हे राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. लाडकी बहीण योजनेची लोकप्रियता वाढल्यामुळेच या योजनेविषयीचे बोर्ड या आंदोलनात नाचवण्यात आले, मात्र महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या तर त्यांचे पैसे अर्थव्यवस्थेत येऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, यासाठीच सरकारनं अतिशय शुद्ध मनानं ही योजना सुरू केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, हे आंदोलन पूर्वनियोजित असण्याच्या शक्यतेची पोलीस पडताळणी करत आहेत. आंदोलनासाठी करण्यात आलेले काही फोनकॉल्स आणि व्हाईस रेकॉर्डिंग्स पोलिसांच्या हाती लागली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. याप्रकरणी आत्तापर्यंत तीनशे जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अडुसष्ट जणांना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यांतर्गत २८ जणांना आज न्यायालयासमोर हजर केलं असता, त्यापैकी २२ जणांना न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

****

दरम्यान, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदेच्या पोलीस कोठडीत न्यायालयानं २६ ऑगस्टपर्यंत वाढ केली आहे. आरोपी अक्षय शिंदेंचं वकीलपत्र घेण्यासही वकिलांनी नकार दिल्याचं वृत्त आहे.

****

कालच्या आंदोलनानंतर आज बदलापूर इथून रेल्वे सेवा आज सुरळीत झाली, मात्र इंटरनेट सेवा अद्याप बंद आहे, समाजमाध्यमांवरून अफवा पसरवण्याला आळा घालण्यासाठी कलम १६३ लागू करण्यात आलं असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

या घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या विरोधी पक्षांच्या वतीनं येत्या चोवीस तारखेला 'महाराष्ट्र बंद' ची हाक दिली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी ही माहिती दिली. ते आज महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

****

बदलापूर घटनेच्या निषेधार्थ आणि राज्य सरकारच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं आज ठिकठिकाणी निदर्शनं करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर तसंच बीड इथं झालेल्या निदर्शनात, आंदोलकांनी बांगड्या फोडून सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

****

महिला आणि बालकांवर होणारे अत्याचार रोखण्याच्या दृष्टीनं एक उपाय म्हणून राज्यातल्या सगळ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि मुंबई उपनगरमधल्या प्रत्येक महाविद्यालयामध्ये पुढच्या महिन्यापासून स्व-संरक्षणाचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज मुंबईत एका समारंभात ही माहिती दिली. शाळा आणि महाविद्यालयांमधल्या महिला शौचालयांमध्ये महिला कर्मचारीच नियुक्त करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचंही लोढा यांनी यावेळी सांगितलं.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेला सलग दुसऱ्या वर्षी जागतिक स्तरावरचं ए प्लस मानांकन मिळालं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबद्दल रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांचं अभिनंदन केलं आहे.

****

राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून आज नितीन पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. काल भाजपानं रायगडचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा केली होती. या दोघांनीही आपाआपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

****

रास्त भाव दुकानदारांचं कमिशन वाढवून देण्यास सरकार सकारात्मक असून याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठपुरावा करून मंजूर करून घ्यावा, अशा सूचना अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या आहेत. आज मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. ई-पॉस मशीनच्या तांत्रिक अडचणी दूर होईपर्यंत ऑफलाईन पद्धतीनं धान्य वितरण सुरू ठेवणार असल्याचंही भुजबळ यांनी सांगितलं.

****

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण परिसरातल्या उजनी पर्यटन आराखड्याच्या २८० कोटी रुपयांच्या कामांना राज्यशासनाच्या उच्च अधिकार समितीने मान्यता दिली आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्याकडे जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा सादर केला होता. उजनी धरणाचे पात्र ९० किलोमीटर लांबीचे असून, या धरणात अक्वॉटिक टुरिझम तसंच वॉटर स्पोर्ट टुरिझम मोठ्या प्रमाणावर विकसित होऊ शकतं, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथल्या नारायणराव वाघमारे महाविद्यालयात आज आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत नारायणराव वाघमारे महाविद्यालयानं सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं. सेनगावच्या तोष्णीवाल महाविद्यालयानं दुसरा तर परभणी जिल्ह्यातल्या राणीसावरगावच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयानं तिसरा क्रमांक मिळवला.

****

डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त परभणीची अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि ज्ञानोपासक महाविद्यालय यांच्यातर्फे संयुक्तपणे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या पुस्तकांचा लोकार्पण सोहळा आज परभणी इथे पार पडला. वैज्ञानिक दृष्टिकोनातून एकात्मतेची भावना निर्माण करून त्यातून राष्ट्राचा विकास घडवण्याची प्रेरणा नरेंद्र दाभोळकर यांच्या पुस्तकांमधून मिळेल, असा विश्वास प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.दि.भा जोशी यांनी यावेळी व्यक्त केला.

****

छत्रपती संभाजीनगरचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेनुसार ‘स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल’ या प्रकल्पाअंतर्गत आज हर्सुल इथं मनपा केंद्रीय प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधनानिमित्त ‘मैत्र जीवांचे’ हे व्याख्यान घेण्यात आलं.

****